ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वार्षिक वर्गणी : ६ रु.
टेलि. ५५६२७
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष ३० | पुणें, बुधवार, २२ जानेवारी, १९६४ | अंक २

## विविध माहिती

**लोखंडाच्या खनिजाची निर्यात**—भारताच्या खनिजें आणि धातु कॉर्पोरेशनने पोलंडच्या व्यापारी संघटनेशीं करार करून १ लाख टन अशुद्ध लोखंड निर्यात करण्याचें ठरविलें आहे. ही निर्यात १९६४ च्या मार्च अखेरपर्यंत पुरी करण्यांत यावयाची आहे. अशुद्ध लोखंडाची निर्यात करण्याचा कार्यक्रम आखण्यासाठी कॉर्पोरेशनचें एक प्रतिनिधि मंडळ लवकरच वॉर्सोला जाणार आहे.

**स्वातंत्र्य-लढ्यावरील नाटक**—रशिआंतील बाकू शहरांत भारताच्या १९ व्या शतकांतील स्वातंत्र्यलढ्याच्या विषयावर आधारलेलें एक नाटक चांगलेंच लोकप्रिय झालेलें आहे. बाकू शहरांत त्याचे आतांपर्यंत ५० प्रयोग करण्यांत आले. नाटकांत लढ्यांतील सामान्य लोकांच्या जीवनावर भर देण्यांत आलेला आहे. भारतीय स्वातंत्र्यलढा पाहिलेल्या एका रशियन प्रवाशाच्या अनुभवावर नाटक रचण्यांत आलेलें आहे.

**शस्त्रक्रियांच्या हत्यारांचा कारखाना**—मद्रासजवळ स्थापन करण्यांत येत असलेल्या शस्त्रक्रियांच्या हत्यारांच्या कारखान्याचें काम जोरांत चालू आहे. रशिआच्या मदतीनें काढण्यांत येत असलेल्या ह्या कारखान्याला ५ कोटी रुपयांपेक्षा अधिक भांडवल लागणार आहे. कारखाना सार्वजनिक मालकीच्या विभागांत आहे. १९६४ अखेर कारखान्यांत उत्पादनाला प्रारंभ होईल. त्यांत १६६ प्रकारचीं हत्यारें तयार करण्यांत येतील. त्यामुळें भारताची ७० टक्के गरज भागेल.

**आरोग्यासाठी उपवासाची मात्रा**—मॉस्कोमधील एका तरुण डॉक्टरनें ४५ दिवसांचा उपवास करून आपलें गेलेलें आरोग्य परत मिळविलें. त्याला कसला तरी सांध्यांचा विकार झालेला होता. उपवासाच्या काळांत त्यानें फक्त औषधी झऱ्यांचें पाणी घेतलें. ४५ दिवसांनंतर भूक अनावर झाल्यावर फळें व त्यांचा रस घेऊन त्यानें उपवास सोडला.

**अतिरिक्त धूम्रपानाचा परिणाम**—मुंबई येथें भरलेल्या हृदयविकारासंबंधींच्या डॉक्टरांच्या चर्चासत्रांत डॉ. दाते ह्यांनीं असें सांगितलें कीं मुंबईमधील हृदयविकारांच्या रोग्यांत अलीकडे वाढ झालेली आहे. रोग्यांपैकीं बरेचसे रोगी ३० ते ४० वर्षें वयाच्या गटांतील असतात. अतिरिक्त धूम्रपानामुळें हृदय एकाएकीं बंद पडण्याचा विकार जोपासला जातो व बळावतो. मादिरापान आरोग्याला जितकें घातक आहे, तितकेंच धूम्रपानहि घातक आहे. अति धूम्रपानामुळें होणाऱ्या दुष्परिणामाबद्दल लोकांना शिक्षण देणें अतिशय अगत्याचें झालें आहे.

**हौशी प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी**—गोव्यांतील उपलब्ध साधन-संपत्तीचा आणि नैसर्गिक शोभेचा उपयोग करून गोव्यांतील अनेक ठिकाणच्या प्रवाशांना आकर्षित करून घेण्यासाठी विकास करतां येईल, असे उद्गार गोव्याच्या गव्हर्नरांनीं काढले आहेत. पणजी येथें प्रवाशांना राहण्यासाठी बांधण्यांत यावयाच्या एका विश्रामगृहाच्या पायाचा दगड ते बसवीत होते. ह्या विश्रांतिगृहासाठी १० लाख रुपये खर्च येणार आहे.

**वेश्येची सिनेनटी होणार**—ब्रिटनमध्यें गाजलेल्या खिस्तीन कीलर प्रकरणांतील वेश्या कु. राईस-डेव्हिस लवकरच सिनेनटी होणार आहे. १८ व्या शतकांतील एका कादंबरीवर आधारलेला एक चित्रपट फ्रान्समध्यें काढण्यांत येणार आहे. कादंबरींत वेश्येच्या जीवनांतील अनेक प्रसंग वर्णन करण्यांत आलेले आहेत. ही कादंबरी ब्रिटनमध्यें जप्त करण्यांत आली आहे. कु. राइस-डेव्हिस चित्रपटांत मुख्य भूमिका करणार आहे.

**लष्करी शिपायांची तपासणी**—हिंदच्या लष्करांतील २५ सैनिकांची लष्करांतील वैद्यकीय अधिकाऱ्यांनीं नमुना-पहाणी केली आहे. हे सैनिक उत्तर आघाडीवर १४,००० फूट उंचीवर दोन वर्षें राहिलेले होते. त्यांना दिल्लींत आणून कांहीं दिवसांनंतर वैद्यकीयदृष्ट्या तपासण्यांत आलें असतां त्यांची प्रकृति उत्तम आढळून आली. दिल्लींत राहणाऱ्या सैनिकांची तपासणी १४,००० फूट उंचीवर त्यांना राहावयास लावून करण्यांत आली. अति उंच ठिकाणीं राहण्यामुळें हृदयावर कांहीं वाईट परिणाम होतो किंवा काय हें पाहण्यासाठी हा उपक्रम हातीं घेण्यांत आला होता.

**छोट्या यंत्रचलित नांगरांची निर्मिति**—फरीदाबाद येथें पोलंडच्या तांत्रिक सहकार्यानें छोटे यंत्रचलित नांगर आणि मोटार सायकली तयार करण्याचा एक कारखाना काढण्यात आला आहे. कारखान्यांत तयार होणाऱ्या नांगरांतील व मोटार-सायकलींतील ७० टक्के भाग देशी बनावटीचे आहेत. अशाच प्रकारची पोलंडमध्यें बनविण्यांत येणारी मोटारसायकल तेथें फार लोकप्रिय झालेली आहे. छोट्या यंत्रचलित नांगरांच्या वापरामुळें छोट्या शेतकऱ्यांना आपल्या पिकांत वाढ करता येईल असे सांगण्यांत येत आहे.

**तंग वेषभूषेला बंदी**—शाळांतून व कॉलेजांतून जाणाऱ्या विद्यार्थिनींना अंगाला चिपचाप बसेल अशा तऱ्हेचा पोषाख घालू नये म्हणून काश्मीरच्या शिक्षणखात्यानें हुकूम काढला आहे. हा पोषाख काश्मीरच्या परंपरेशीं विसंगत आहे, असें सरकारचें म्हणणें आहे.

### रशिआच्या सोनेंविक्रीचा किमतीवर परिणाम

सोनें-चांदीचा व्यापार करणाऱ्या लंडनमधील प्रमुख कंपनीनें आपल्या वार्षिक माहितीपत्रकांत ह्या मौल्यवान धातूंच्या १९६३ मधील व्यापाराचा आढावा घेतला आहे. ह्या धातूंच्या जागतिक बाजारांतील गेल्या वर्षांतील सर्वांत महत्त्वाची घटना म्हणजे रशिआनें केलेली सोन्याची विक्री. गेल्या वर्षांत रशिआनें पूर्वी कधींहि विकलें नव्हतें इतकें सोनें युरोपच्या बाजारांत विकलें. कांहीं अंदाजाप्रमाणें रशिआनें ४०० टन सोन्याची विक्री केली आहे. त्यांपैकी कांहीं सोन्याचा प्रत्यक्ष हातपालट मात्र चालू वर्षीं करण्यांत येणार आहे. १९६३ सालीं सोन्याचा सांठा करण्यासाठी होणारी मागणी घटल्याचें आढळून आलें. दक्षिण आफ्रिका व रशिआ ह्यांच्याकडून बाजारांत सोन्याचा पुरवठाहि अधिक झाला. त्यामुळें मध्यवर्ती बँकांजवळील सोन्याचा सांठा १९६२ च्या तुलनेनें अधिक वाढला. मध्यवर्ती बँकांनीं सहकार्य करून सुवर्णसंचय केला आणि बँक ऑफ इंग्लंडतर्फे सोन्याचे व्यवहार पार पाडले; त्यामुळें सोन्याचांदीच्या किमतीमधील चढउतार बेताच्या मर्यादेंत झाले. रशिआ अमेरिकेकडून मोठ्या प्रमाणावर गव्हाची खरेदी करीत आहे. ह्या खरेदीची किंमत चुकती करण्यासाठी रशिआनें सोनें विकलें असें म्हणतात. गेल्या वर्षाच्या सप्टेंबरच्या सुमारास रशिआ सोनें विकूं लागला. कारण त्या वेळीं रशिआंतील गव्हाचें पीक अपेक्षेप्रमाणें येणार नाहीं हें उघड झालें होतें. रशिआनें आपल्या गरजेपोटीं सोनें विकलें असलें तरी त्यामुळें जगांतील सोन्याच्या किमती भडकूं न देण्यास मदत झाली. अमेरिकेला सध्यां डॉलरची किंमत स्थिर राखण्याची खटपट करावी लागत आहे. सोन्याच्या किमती वाजवी पातळीवर राहिल्यानें अमेरिकेला अप्रत्यक्ष मदत झाली. गेल्या वर्षीं चीननें जागतिक बाजारांत चांदी विकली नाहीं. छायाचित्रणांत लागणाऱ्या चांदीबद्दल दुसरा पर्यायी पदार्थ वापरण्यांत न आल्यास व चांदीचीं नाणीं पाडणें चालू राहिल्यास चांदीच्या किमतींत पुष्कळ वर्षे फारसा फरक पडणार नाहीं.

### भाग्योदय कॅलेंडर, १९६४

( प्रकाशकः आर. एच्. चौधरी, गणपत गल्ली, बेळगांव )

वरील कॅलेंडरच्या प्रसिद्धीचें हें १८ वें वर्ष आहे. कॅलेंडर वैशिष्ट्यपूर्ण असून त्यावरून इंग्रजी तारखेबरोबर पंचांगाचीं अंगेंहि समजतात; कोणत्याहि कार्याचे शुभाशुभ दिवस कळतात. लग्न-मुंज-वास्तुशांतीचें मुहूर्त, संकष्ट्या, चंद्रोदय, जयंत्या, पुण्यतिथ्या, यात्रा, जत्रा, विशेष दिवस, इतर धर्मीयांचेहि सणवार, सरकारी, बँकांच्या व पोस्टाच्या सुट्ट्या, पावसाचे दिवस, इत्यादि सर्व व्यावहारिक माहिती कॅलेंडरांत दिलेली आहे. स्मरणार्थ नोंदीसाठी स्वतंत्र रकाना आहे. राजकीय भविष्य आणि वैयक्तिक राशीभविष्यहि कॅलेंडरावरून समजतें. ह्यामुळें, घराप्रमाणें दुकानांत व कचेरींतहि हें कॅलेंडर उत्तम माहिती पुरवून मार्गदर्शन करील, ह्यांत शंका नाहीं.

### पेटंटसाठी महाराष्ट्रांतून सर्वांत अधिक अर्ज

पेटंटसाठी १९६२ मध्यें ५,८१३ अर्ज आले; १९६१ मध्यें ५,२८९ अर्ज आले होते. १९६२ मध्यें आलेल्या अर्जांपैकी निरनिराळीं राज्यें व केंद्रशासित प्रदेशांतून ८१४ व बाकीचे परदेशांतून आले होते. परदेशांतून १९६१ पेक्षा १९६२ मध्यें ४० अर्ज अधिक आले. आलेल्या एकूण अर्जांपैकी ५७ टक्क्यांहून अधिक अर्ज महाराष्ट्र व पश्चिम बंगालमधून आले. महाराष्ट्रांतून २४७ व पश्चिम बंगालमधून २१८ अर्ज आले.


दूरध्वनि : २२४८३. तार : सेंको बँक

## पुणें सेंट्रल

## को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, पुणें

लक्ष्मी पथ-पुणें शहर.

**व्याजाचे नवीन आकर्षक दर-**

| | |
|---|---|
| चालू ठेव ... ... | १/४ टक्के |
| सेव्हिंग्ज ... ... | ३ टक्के |
| **कायम ठेव-** | |
| १ महिना ... ... | ३·३७ टक्के |
| ३ महिने ... ... | ३·५० टक्के |
| ६ महिने ... ... | ३·७५ टक्के |
| १ वर्ष ... ... | ४ टक्के |
| २ वर्षें ... ... | ४·२५ टक्के |
| ३ वर्षांचे वर ... ... | ४·५० टक्के |

**याशिवाय भक्कम सुरक्षित ठेवघरें.**

*आमच्या बँकेच्या कोणत्याहि शाखेस भेट द्या.*
*सर्व माहिति आनंदानें पुरवूं.*

डी. बी. तांबट
कार्यकारी संचालक.



## बचत करणें

म्हणजेंच

## यशस्वी होणें

| | | | |
|---|---|---|---|
| तुम्हीं दरमहा रु. १०/- ३६महिने द्या. | रु. ३६०·०० | रु. ३८९·०० | तुम्ही ३७ व्या महिनाअखेर मिळवा. |
| तुम्हीं दरमहा रु. १०/- ४८महिने द्या. | रु. ४८०·०० | रु. ५२१·५० | तुम्हीं ४९ व्या महिनाअखेर मिळवा. |
| तुम्हीं दरमहा रु. १०/- ६०महिने द्या. | रु. ६००·०० | रु. ६६८·५० | तुम्हीं ६१ व्या महिनाअखेर मिळवा. |

**आमचेकडे**

**क्युम्युलेटिव्ह डिपॉझिट खातें उघडा**

## दि बेळगांव बँक लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३० )

रजिस्टर्ड ऑफिस : रविवार पेठ, बेळगांव.

# अर्थ

बुधवार, २२ जानेवारी, १९६४





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## उद्योगधंद्यांना करण्यांत येणारा विजेचा पुरवठा

भारताचें औद्योगीकरण झपाट्यानें व्हावें म्हणून बहुतेक सर्व राज्यांतून उद्योगधंद्यांना सवलतीच्या दरानें विजेचा पुरवठा करण्याचें धोरण अमलांत आणण्यांत येत आहे. विजेच्या उत्पादनासाठी जो खर्च येतो त्यापेक्षांहि कमी दरानें उद्योगधंद्यांना सध्यां वीज पुरविण्यांत येत असते. विजेच्या पुरवठ्याच्या ह्या पद्धतीविषयीं जागतिक बँकेनें भारत सरकारला एक अहवाल नुकताच सादर केला आहे. अहवालांत ह्या पद्धतीविषयीं आक्षेप घेण्यांत आला आहे. मोठ्या प्रमाणावर वीज वापरणाऱ्या मोठ्या औद्योगिक संघटनांना अशा रीतीनें कमी दरानें विजेचा पुरवठा करणें वाजवी नाहीं; विजेच्या दरापेक्षा वीज उपलब्ध आहे कीं नाहीं ह्याला अधिक महत्त्व आहे असें बँकेचें म्हणणें आहे. शिवाय, विजेचे दर कमी ठेवण्यानें वीज-उत्पादनाला उत्तेजन मिळून विजेच्या उत्पादनांत वाढ होत आहे असेंहि आढळून येत नाहीं; उलट, दर कमी असल्यानें वीज-उत्पादनाच्या सामर्थ्याचा विकास करण्यासाठी लागणारा भांडवलाचा संचय होण्यास त्यामुळें अडथळाच होतो असेंहि बँकेचें म्हणणें आहे. विजेच्या प्रत्येक किलोवॅट-तासाचा सरासरी दर जर ०·११६ रुपयापर्यंत वाढविण्यांत आला तर तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत ५०० कोटी रुपयांचा फायदा होणार आहे. सध्य देशांत वापरल्या जाणाऱ्या विजेपैकी ७० ते ७५ टक्के वीज उद्योगधंद्यांकडून वापरली जाते. तेव्हां उद्योगधंद्यांना करण्यांत येणाऱ्या विजेच्या दरांत थोडीशी जरी वाढ करण्यांत आली तरी उत्पन्नांत बरीच मोठी भर पडण्यासारखी आहे. ह्या वाढीमुळें विजेच्या उत्पादनाच्या खर्चांत मात्र म्हणण्यासारखी भर पडणार नाहीं. ब्रिटनमध्यें घरगुती कारणासाठी वापरण्यांत येणाऱ्या व उद्योगधंद्यांसाठी वापरण्यांत येणाऱ्या विजेच्या दरांत एक-दोन नया पैशांचा काय तो फरक आहे. भारतांत मात्र हा फरक १६ ते १९ नये पैसे इतका मोठा आहे.

## अर्थव्यवस्थेंत बाजारपेठांचें वाढतें महत्त्व

कॅलिफोर्निआ विद्यापीठांतील प्रा. डीन रॉबिन्स ह्यांनीं अर्णाकुलम् येथें बोलतांना भारतामधील अर्थव्यवस्थेबद्दल आपले विचार व्यक्त केले आहेत. केरळ राज्य उत्पादकता मंडळ आणि कारभार-व्यवस्था संस्था ह्यांच्या संयुक्त बैठकीपुढें ते भाषण करीत होते. आपल्या भाषणांत ते म्हणाले कीं, भारताच्या अर्थव्यवस्थेंत यत्या एक-दोन पिढ्यांत बाजारपेठा मिळविण्याच्या व राखण्याच्या कसवाला विशेष महत्त्व येणार आहे. सध्या अशी स्थिति आहे कीं दर्जाच्या दृष्टीनें सुमार असलेला अनेक प्रकारचा माल चढ्या किमतीला खपत आहे. पण ही स्थिति कायमची टिकण्यासारखी नाहीं. उद्योगधंद्याच्या व व्यापाराच्या कारभार-व्यवस्थेकडे दिवसानुदिवस अधिक लक्ष पुरविणें अगत्याचें आहे. कारण जगांतील उत्पादनाच्या तंत्राचा विकास झपाट्यानें होत आहे. जगाची लोकसंख्या अतिशय वेगानें वाढत आहे आणि त्याचबरोबर दळणवळणाच्या सुलभ व शीघ्र सोयींनीं देशादेशांमधील अंतर नाहींसें होत चाललेलें आहे. म्हणून भारतामधील विद्यापीठांनीं धंद्यांची संघटना आणि कारभार-व्यवस्था ह्यांच्या अभ्यासाची सोय करावी. अशा प्रकारच्या अभ्यासक्रमांची सोय करण्यांत आली तर आणखी कांहीं वर्षांनीं व्यापारी व औद्योगिक संघटनांना लागणारीं शिक्षित माणसें मिळण्यास अडचण पडणार नाहीं. भारताच्या अर्थव्यवस्थेच्या विकासाला परदेशीय चलनाच्या टंचाईची अडचण भासत आहे हें खरें; पण ही अडचण फक्त भारतालाच भासते असें मानण्याचें कारण नाहीं. खुद्द अमेरिकेला सुद्धां परदेशीय चलनाची दुर्मिळता चांगली जाणवत आहे. कारण अमेरिकेला तिच्या डॉलरच्या मागें परदेशीय चलनाच्या पाठिंब्यामुळें मिळणाऱ्या बळाची आवश्यकता वाटत आहे. जगांतील अनेक देशांच्या गरजा अमेरिकेला मोठ्या प्रमाणावर भागवाव्या लागतात. त्यामुळें परदेशीय चलनाचा प्रश्न अधिकच बिकट झाला आहे.

## डिझेल इलेक्ट्रिक रेल्वे एंजिनांचा कारखाना

वाराणसी येथें उभारण्यांत आलेल्या डिझेल-इलेक्ट्रिक रेल्वे-एंजिनांच्या कारखान्यांत तयार करण्यांत आलेलें पहिलें एंजिन नुकतेंच बाहेर पडलें आहे. भारतामधील रेल्वेवहातूक ही अर्थव्यवस्थेंतील फार मोक्याची जागा असल्यानें ह्या घटनेला असाधारण महत्त्व आहे. चित्तरंजन येथील रेल्वे-इंजिनांच्या कारखान्यांत विजेचीं इंजिनें आतां तयार होऊं लागलींच आहेत. देशांतील रेल्वेच्या वहातुकीचें आधुनिकीकरण करण्यांत आणि तांत्रिक दृष्ट्या ती अद्यावत् करण्यांत वाराणसी येथील कारखान्यानें नवा टप्पा गाठला आहे. ह्या कारखान्यांत तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत ८३ रेल्वे-एंजिनें तयार होऊं शकतील असा अंदाज आहे. १९६७-६८ च्या सुमारास ह्या कारखान्यांत दरसाल १५० रेल्वे-एंजिनें तयार होऊं लागतील. कारखान्यानें आपल्या उत्पादनक्षमतेची सीमा गाठल्यावर दरसाल २० कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची बचत होऊं लागेल. शिवाय, जरूर पडल्यास कारखान्याचा विस्तार करतां यावा ह्या दृष्टीनेंच त्याची आखणी प्रथमपासून करण्यांत आलेली आहे. उत्पादन संपूर्णपणें चालू झाल्यावर कारखाना ४ हजार कामगारांना रोजगार उपलब्ध करून देईल. प्रारंभीं रेल्वे-एंजिनांतील सर्वच भाग देशी बनावटीचे असणार नाहींत. तरी पण उत्पादनाचा वेग जसजसा वाढत जाईल तसतसें देशी भागांच्या वापराचें प्रमाण ९० टक्क्यांच्या जवळपास पोंचेल. कारखान्याच्या उभारणीसाठी २० कोटी रुपयांचें भांडवल लागणार आहे. अमेरिकेमधील अलको ह्या सुप्रसिद्ध कंपनीचें तांत्रिक सहकार्य कारखान्यासाठी मिळविण्यांत आलें आहे. डिझेल इलेक्ट्रिक रेल्वे एंजिनें बांधण्यांत ह्या कंपनीचा हातखंडा आहे. एंजिनें बांधण्यासाठी लागणारें तंत्रविज्ञान तर कंपनी पुरवीलच पण, त्याचबरोबर हिंदी तंत्रज्ञ शिकवून तयार करण्यालाहि हातभार लावील.

## कै. प्रिन्सिपॉल वि. के. जोग

### महाराष्ट्र बँक : मनाच्या थोरपणाचें स्मारक

प्रिन्सिपॉल वि. के. जोग ह्यांच्या निधनानें एक अत्यंत कर्तृत्ववान शिक्षणतज्ज्ञ आपल्यांतून नाहींसा झाला. त्यांच्या नेतृत्वानें निर्माण झालेल्या विविध शिक्षणसंस्थांतून हजारों विद्यार्थी शिकून बाहेर पडत आहेत आणि देशाच्या आर्थिक व औद्योगिक उद्धाराला हातभार लावीत स्वतःचा उत्कर्ष घडवून आणीत आहेत. कै. अण्णासाहेब ह्यांची दुसरी एक अप्रत्यक्ष मोठी कामगिरी येथें नमूद करणें आवश्यक आहे.


कै. प्रोफेसर वा. गो. काळे आणि कै. प्रोफेसर वि. के. जोग हे दोघेहि डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सदस्य होते आणि फर्ग्युसन कॉलेजांत प्राध्यापक होते. कांहीं मतभेद होऊन प्रोफेसर जोग आपल्या कांहीं सहकाऱ्यांसह संस्थेतून बाहेर पडले आणि त्यांनीं मॉडर्न एज्युकेशन सोसायटी स्थापून वाडिया कॉलेज सुरू केलें. प्रोफेसर काळे सेवानिवृत्त झालेले होते, तरी फर्ग्युसन कॉलेजांत ह्या अडचणींचे वेळीं मुद्दाम जाऊन अर्थशास्त्राप्रमाणें इतरहि विषय शिकवूं लागले. तथापि, प्रोफेसर जोग आणि प्रोफेसर काळे ह्यांचा स्नेह आणि एकमेकांविषयीं आदर कायम होता आणि बँक ऑफ महाराष्ट्र लि. च्या मॅनेजरची जागा १९४२ सालीं रिकामी झाली, तेव्हां प्रोफेसर काळे ह्यांना प्रो. अण्णासाहेब जोगांचे चिरंजीव श्री. चिं. वि. जोग ह्यांची आठवण झाली. त्याप्रमाणें त्यांनीं अण्णासाहेबांना बोलून दाखविलें. प्रोफेसर काळे ह्यांच्यावर अण्णासाहेबांचा विश्वास असल्याकारणानें त्यांनीं ह्या बाबतींत आपल्या चिरंजीवांना योग्य तोच सल्ला दिला, आणि श्री. चिं. वि. जोग हे बँक ऑफ महाराष्ट्र लि.ला येऊन मिळाले.

आपल्या मित्राच्या नव्या, लहान बँकेशीं आपल्या कर्तबगार ज्येष्ठ चिरंजीवाचें भवितव्य निगडित करण्यांत अण्णासाहेबांना यत्किंचितहि साशंकता वाटली नाही. परस्पर विश्वासाचें हें अत्यंत उद्बोधक उदाहरण आहे. त्या वेळीं बँकेचें खेळतें भांडवल अर्धा कोटी रु. सुद्धां नव्हतें आणि श्री. चिं. वि. जोग हे एका मोठ्या समृद्ध बँकेंत अधिकाराच्या जागेवर काम करीत होते, ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. अशा रीतीनें बँक ऑफ महाराष्ट्राच्या उन्नतीस प्रोफेसर जोगांनीं फार मोठा हातभार लावला आहे. "महाराष्ट्र बँक ही कांहीं झालें तरी लहान बँक आहे; तिच्यांत तुझ्या उत्कर्षाला फारसा वाव नाहीं" असा कांहीं मित्रांचा सल्ला बाजूला सारूनहि श्री. चिं. वि. जोग महाराष्ट्र बँकेला येऊन मिळाले, ह्याचें कारण आपल्या स्वतःच्या प्रांताकरतां व लोकांकरतां कांहीं-तरी करण्याची तळमळ त्यांच्यांत होती, हें तर खरेंच. परंतु, प्रो. काळे ह्यांचें डायरेक्टर बोर्डावरील अस्तित्व आणि कै. प्रोफेसर जोगांचा प्रो. काळे ह्यांचेवरील विश्वास ह्या दोन गोष्टींचें महत्त्व विसरून चालणार नाहीं. कारण, श्री. चिं. वि. जोगांचा प्रो. काळे ह्यांचेशीं ह्यापूर्वीं कधींच संबंध आलेला नव्हता. कै. प्रो. अण्णासाहेब जोग आणि कै. प्रो. काळे ह्यांच्या परस्पर विश्वासाचें फळ म्हणजेच आजची महाराष्ट्र बँक होय. मतभेदांना तेवढ्यापुरतेंच महत्त्व देऊन महत्त्वाच्या बाबतींत स्वार्थत्यागी थोर माणसें कशीं मोठ्या मनानें महत्कार्य करतात, ह्याचें हें उत्कृष्ट उदाहरण आहे.

---

### जागतिक प्रदर्शनांतील दालनाचा खर्च

न्यू यॉर्कमध्यें भरविण्यांत येणाऱ्या जागतिक प्रदर्शनांत आपलें दालन उभारण्यासाठी भारत सरकारला १·६५ कोटी रुपये खर्च येणार असून त्यापैकी १·३० कोटी रुपये परदेशीय चलनाच्या रूपांत लागणार आहेत.



## भारताचा नंबर प्रत्येक बाबतींत शेवटचा !

### धान्योत्पादनाची वाढ कशी होईल ?

श्री. संपादक " अर्थ "
न. वि. वि.

'अर्थ' पत्राच्या १ जानेवारी, १९६४ च्या अंकांतील "कांहीं तुलनात्मक आंकडे" या सदराखाली दिलेली माहिती फारच महत्त्वाची व विचारप्रवर्तक आहे. या माहितीमध्यें नऊ देशांतील सात महत्त्वाच्या त्या त्या देशांतील दैनंदिन बाबीच्या प्रत्येक व्यक्तीशीं संबंध येणाऱ्या विषयासंबंधानें आंकडेवार तौलनिक माहिती आलेली आहे. दिलेल्या नऊ देशांच्या माहितीमध्यें प्रत्येक बाबतींत भारताचा नंबर अगदीं शेवटचा येतो. निर्देशित केलेल्या सात बाबींपैकी दरमाणशीं उत्पन्नाचें प्रमाण व दरमाणशीं मिळणाऱ्या कॅलरीज (म्हणजे मिळणाऱ्या अन्नाचें प्रमाण) या दोन महत्त्वाच्या बाबी विचारांत घेतल्यास भारताची फारच निकृष्ट स्थिति आहे असें दिसून येतें. भारतांतील दरमाणशीं उत्पन्नाचें प्रमाण फक्त रु. ३२७ असून अमेरिकेंतील दरमाणशीं उत्पन्न रु. १०,८९६ म्हणजे भारताच्या ३३ पट पडतें. त्याप्रमाणेंच भारतांतील प्रत्येक माणसास मिळणाऱ्या कॅलरीज फक्त १९८० असून अमेरिकेंतील हें प्रमाण माणशीं ३१२० कॅलरीज आहे. म्हणजे सुमारें दीडपट पडतें. त्यावरून भारत देशांतील माणसास पोटभर अन्न मिळण्याकरितां शेतीच्या उत्पन्नांत वाढ होऊन मुबलक धान्य तयार झालें पाहिजे, हें उघड होतें.

महाराष्ट्राच्या दृष्टीनें विचार करितां शेती सुधारण्याचीं मुख्य साधनें म्हणजे पिकास पाण्याचा योग्य वेळीं भरपूर पुरवठा व जमिनीची बांदबंदिस्ती करून जमिनीचा होणारा नाश थांबविणें हीं होत. याकरितां प्रत्येक गांवच्या शिवारांतून वाहणारे ओढे, नाले, ओहोळ, यांस बंधारे घालून लहान लहान जलाशय निर्माण करणें हें होय. यामुळें शेतीच्या उत्पन्नांत वाढ होऊन दर माणशीं पैशाच्या उत्पन्नांतहि वाढ होणेस मदत होईल. शेतीस जोडधंदा म्हणून ग्रामिण भागांतील निसर्गसंपत्तीचा उपयोग करून लहान लहान उद्योगधंद्यांची ग्रामीण भागांतच वाढ झाली पाहिजे. यामुळें ग्रामीण भागांतील जनतेस काम मिळेल. त्यांना शेती सोडून बाहेरगांवीं जाण्याचें कारण पडणार नाहीं.

"अर्थ"नें निरनिराळ्या बाबींसंबंधीं आंकडेवार संकलित माहिती देऊन जनतेच्या नजरेस सर्व परिस्थिति आणण्याचें महत्त्वाचें कार्य केलें आहे, यांत संदेह नाहीं.

पुणें ६–१–६४ वा. कृ. कोगेकर


भारतांतील प्रमुख नागरी सहकारी बँक!
सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ९·८३ लाख |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ११·३३ " |
| ठेवी | रु. | ३५९·९२ " |
| खेळतें भांडवल | रु. | ३९४·५२ " |

शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणें व बेळगांव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकदवरी लेन, मुंबई ४.


स्थापना १९१८



# जनता सहकारी बँक लि. सांगली.

फोन नं. २४४ ] सांगली [ रजि. नं. २४०९८

★ नववर्षाचे खास आकर्षण ★

ज ) करंट खातें : व्याजाचा दर द. सा. द. शें. ३/४%
न ) सेव्हिंग्ज खातें : " " ३१/२%
ता ) मुदत ठेव : " " ४१/२% ते ५१/२%
( कॉल ठेवींची आकर्षक सवलत व व्याजाचा दर याबद्दल समक्ष चौकशी करावी )

★ प्रगतिपथावरील बोलके आंकडे ★

स ) अधिकृत शेअर भांडवल रु. ५,००,०००
ह ) वसूल झालेलें शेअर भांडवल रु. २,१५,०२५
का) एकूण ठेवी रु. १३ लाखांचे वर
री ) एकूण खेळतें भांडवल रु. १३ लाखांचे वर

★ विशेष माहिती ★

बँ ) बँकेस सुरुवातीपासून ऑडिट वर्ग 'अ' मिळाला.
क ) बँकिंगचें सर्व प्रकारचें काम केले जाते.
लि.) संपूर्ण सेवा : संपूर्ण सुरक्षितता.

एम्. एस्. कराळे चेअरमन
एस्. एस्. पांड्याजी — मॅनेजर
आमदार वसंतरावजी पाटील — व्हा. चेअरमन



# दि सांगली बँक लि.

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ६,५०,००० चे वर |
| रिझर्व्ह फंडस् | रु. १०,००,००० चे वर |
| खेळतें भांडवल | रु. ४ कोटींचे वर |

★ महाराष्ट्र व म्हैसूर राज्यांत मिळून एकूण २३ शाखा

★ आकर्षक दरानें ठेवी स्वीकारल्या जातात व सर्व प्रकारचे बँकिंगचे अद्ययावत् व्यवहार योग्य तऱ्हेनें केले जातात.

★ हेड ऑफिस सांगली व इचलकरंजी, रविवार पेठ-पुणें आणि बेळगांव या शाखांमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्टस्ची सोय करण्यांत आली आहे.

अधिक माहितीसाठी नजिकच्या शाखाधिकाऱ्यास अवश्य भेटा.

रजिस्टर्ड ऑफिस, राजवाडा चौक, सांगली.


एम्. के. गुते
M. A., LL. B., C. A. I. I. B.
मॅनेजर.

### मेट्टुर येथील अल्युमिनमचा कारखाना

मेट्टुर येथे अल्युमिनम तयार करण्याचा एक कारखाना इटालियन कंपनीच्या तांत्रिक सहकार्याने काढण्यांत येत आहे. ह्या कारखान्याच्या उभारणीसाठी १० कोटी रुपये खर्च येणार असून प्रत्यक्ष उत्पादनास येत्या जुलै अगर ऑगस्ट महिन्यांत प्रारंभ होईल अशी अपेक्षा आहे. कारखान्याची जास्तीत जास्त उत्पादनक्षमता दरसाल २० हजार टनांची आहे. परंतु ती गांठण्यास १९६४ ची अखेरी उजाडेल. कारखान्यासाठी लागणाऱ्या बॉक्साइटच्या खनिजाचा पुरवठा मेट्टुरपासून ५० मैलांवर असलेल्या खाणींतून करण्यांत येणार आहे. कारखान्यासाठी ४॥ कोटी रुपयांची परदेशीय यंत्रसामग्री आयात करावी लागली. दरसाल १० हजार टन अल्युमिनम उत्पादन करण्यासाठी कारखान्याला ६० हजार टन बॉक्साइट लागेल.

### शस्त्रास्त्रांच्या उत्पादनांत वाढ

१९६४ सालीं शस्त्रास्त्रांच्या व संरक्षणसाधनांच्या निर्मितीचें उद्दिष्ट १०० कोटी रुपयांचें ठरविण्यांत आलें होतें. प्रत्यक्ष उत्पादन ह्याहीपेक्षा अधिक होईल असा अंदाज आहे. १९६२-६३ च्या आर्थिक वर्षांत संरक्षणविषयक उत्पादनाच उद्दिष्ट ५८ कोटी रुपयांचें ठरविण्यांत आलें होतें. प्रत्यक्ष उत्पादन मात्र ६३·९० कोटी रुपयांचे झालें. खाजगी मालकीच्या विभागांकडूनहि संरक्षणसाहित्य मिळविण्यांत येत आहे. १९६४ सालीं ह्या विभागांतून भारत सरकार २५० कोटी रुपये किंमतीची सामग्री विकत घेणार आहे. म्हणजे संरक्षणखात्याच्या अंदाजपत्रकापैकी सुमारें २६ टक्के खर्च खाजगी विभागाकडील खरेदीवर करण्यांत येईल.

"हाले चैतन्याचे चाक"

—सर्व संकटे, अडथळे दूर सारून
लोकशाही समाजवादाच्या
दिशेनें प्रगतीची वाटचाल झाली पाहिजे.
आज आपण जो मार्ग चोखाळतो आहोत
त्यावरील आपल्या निष्ठेचा पुनरुच्चार करु या.
विषमता व अन्याय ह्यांना मूठमाती दिली पाहिजे.
वैयक्तिक स्वातंत्र्य, निष्ठा, प्रामाणिकपणा
आणि कार्यक्षमता हाच जेथें मानदंड
मानण्यात येईल अशा समाजाची
आपणाला भारतात उभारणी
करावयाची आहे त्याची आठवण राहूं द्या.

...ध्येयाच्या दिशेने आगेकूच करू या

प्रसिद्धि संचालक, महाराष्ट्र शासन, मुंबई

## घरें बांधण्यासाठी आयुर्विमा कॉर्पोरेशनचें साह्य

आयुर्विमा कॉर्पोरेशननें स्वतःच्या मालकीचीं घरें बांधण्यासाठी विमेदारांना कर्जाऊ मदत देण्याची योजना जाहीर केल्यापासून कॉर्पोरेशनकडे मोठ्या प्रमाणावर अर्ज करण्यांत येत आहेत. कॉर्पोरेशननें आतांपर्यंत १० हजार अर्जांच्या प्रती विमेदारांना पुरविल्या आहेत. घरें बांधण्यासाठी बंगलोर, अर्नाकुलम् आणि कलकत्ता ह्या शहरांतील विमेदारांकडून अधिक प्रमाणांत अर्ज येत आहेत. कारण ह्या शहरांच्या परिसरांत बांधण्यासाठी जमीन सहज मिळण्यासारखी आहे. त्या मानानें मुंबईतील कचेरीकडे फारसे अर्ज आलेले नाहींत. सध्यां घरबांधणीची कॉर्पोरेशन पुरस्कृत योजना २६ मोठ्या शहरांना लागू करण्यांत आली असून लवकरच आणखी ३० मोठीं गांवेंहि योजनेच्या कक्षेंत येतील. योजना जर यशस्वी झाली तर १ लाख लोकवस्ती असणाऱ्या गांवांतील विमेदारांनाहि तिचा लाभ करून देण्याची कॉर्पोरेशनची मनीषा आहे.

## कॅन्सरमुळें झालेल्या मृत्यूंत वाढ

१९६२ मध्यें ब्रिटनमध्यें फुप्फुसाच्या कॅन्सरची बाधा झाल्यामुळें आतांपर्यंत सर्वांत अधिक मृत्यु घडून आले. ह्या रोगांमुळें २०,२७८ पुरुष आणि ३,५०१ स्त्रिया दगावल्याची नोंद करण्यांत आलेली आहे. १९६२ मध्यें इंग्लंड व वेलसमध्यें मरण पावलेल्या लोकांपैकीं १,०१,६०८ लोक कॅन्सरनें दगावलेले आहेत. ह्याउलट क्षयरोगानें मृत्यु येणारांची संख्या मात्र घटली आहे. दहा वर्षांपूर्वी क्षयरोगानें दगावलेल्यांची संख्या ९,३३५ होती ती १९६२ सालीं २,७७४ पर्यंत खाली आली. पोलिओ ह्या रोगामुळें सर्वांत कमी म्हणजे फक्त १८ माणसें दगावलीं. देवीच्या रोगाची बाधा ६६ लोकांना झाली व त्यांतील २६ माणसें मेलीं. १९३० सालानंतर देवीच्या रोगानें मृत्यु पावलेल्यांची ही संख्या सर्वांत अधिक आहे.

## सिगारेट ओढण्यास कायद्यानें मनाई

अमेरिकेंतील टेक्सस राज्यांतील ईस्टलँड शहराच्या कौन्सिलनें शहराच्या हद्दींत सिगारेट्स ओढण्यास बंदी केली आहे. बंदी मोडणाऱ्यास ३ वर्षें कैदेची शिक्षा आणि १ हजार डॉलर्सच्या दंडाची शिक्षा ठेवण्यांत आली आहे. प्रवासामध्यें शहरांतून जाणाऱ्यांना बंदी लागू नाहीं. सिगारेटस् जवळ बाळगणें हाहि गुन्हा ठरविण्यांत आला आहे. घरांत सिगारेट्स ओढण्यास मात्र बंदी नाहीं.

## नेपाळमध्यें लोकरीच्या कापडाची गिरणी

नेपाळमधील पहिली लोकरीच्या कापडाची गिरणी लवकरच उत्पादन करूं लागेल. एक हिंदी कंपनी जपानी कंपनीच्या तांत्रिक सहकार्यानें गिरणी उभारीत आहे. गिरणीसाठी लागणारी ८१ लाख रुपयांची यंत्रसामग्री जपान पुरविणार आहे. यंत्रसामग्री येण्यास अद्याप ४ महिन्यांचा अवधी आहे.

## बेळगांव बँकेच्या आणखी चार शाखा

दि बेळगांव बँक लि. ला रिझर्व बँकेकडून म्हैसूर राज्यांतील (१) कुडची (S. Ry.), (२) गुळेद्गुड्ड (जि. विजापूर), (३) हुकेरी (जि. बेळगांव), (४) राणेबिन्नूर (जि. धारवाड) ह्या चार ठिकाणीं शाखा काढण्यास परवानगी मिळाली आहे; त्या यथावकाश सुरू होतील.

## शेतीसाठी स्वस्त दरानें विजेची मागणी

उत्तर बिहारमधील शेतीच्या व उद्योगधंद्यांच्या विकासासाठी मध्यवर्ती सरकारनें स्वस्त दरानें वीज द्यावी अशी सूचना बिहार सरकारकडून करण्यांत आली आहे. बरौनी येथील उष्णताजन्य वीजकेंद्राला पुरविण्यांत येणारा दगडी कोळसाहि स्वस्त देण्यांत यावा अशी राज्य सरकारची मागणी आहे. कांहीं राज्यांतून विजेसाठी पुरविण्यांत येणारा कोळसा १५ रुपये टनाप्रमाणें देण्यांत येतो, तर बिहारला मात्र दर टनामागें ४० रुपये द्यावे लागतात.

## नाशिक जिल्हा बँकेची उमराणा शाखेची इमारत

नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेनें आपल्या उमराणा येथें बांधलेल्या पहिल्या नव्या इमारतीचा उद्घाटनसमारंभ गुरुवार, दि. १६ जानेवारी रोजीं नामदार के. सि. सोनावणे, (मंत्री सहकारखातें) ह्यांच्या हस्तें झाला. त्या दिवशीं दुपारीं २ वाजल्यापासून शाखेचें कामकाज नव्या इमारतींत सुरू झालें.

## पाकिस्तानची तिसरी पंचवार्षिक योजना

पाकिस्तानची तृतीय पंचवार्षिक योजना ४,९५० कोटी रु. ची आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा आकार २,३०० कोटी रु. आहे. तिसऱ्या योजनेसाठी परदेशी मदतीची अपेक्षा १,६५० कोटी रु. ची आहे. पूर्व पाकिस्तानच्या वांट्याला २,५५० कोटी रु. आणि पश्चिम पाकिस्तानच्या वांट्याला २,४०० कोटी रु. येतील. राष्ट्रीय उत्पन्न ३०% वाढावें, अशी अपेक्षा आहे.

## रिझर्व्ह बँकेचे नवे डायरेक्टर

हिंदुस्थान लिव्हर लि. चे चेअरमन श्री. पी. एल. टंडन ह्यांची रिझर्व्ह बँकेच्या सेंट्रल बोर्डाचे डायरेक्टर म्हणून १५ जानेवारीपासून नेमणूक झाली आहे.

## दि कॅनरा बँक लि.

दि कॅनरा बँक लि. च्या ठेवी गेल्या वर्षी ५०·५८ कोटी रु. च्या ७२ कोटींवर गेल्या; कर्जें २७ कोटी रु. चीं ४२ कोटी रु. झालीं. निव्वळ नफा २४ लक्ष रु. झाला. मागील वर्षी तो १५·४४ लक्ष रु. होता.

## मनिऑर्डरींच्या अपहाराला आळा

नॅशनल डिफेन्स फंडाला पाठविलेल्या मनिऑर्डरींच्या रकमेचा अपहार केला जात असल्याच्या बऱ्याच तक्रारी आहेत. अशा अपहारांना आळा घालण्यासाठी उपाययोजनांचा विचार चालू आहे. वेगवेगळ्या रंगांचे फॉर्म छापले, म्हणजे मनिऑर्डरीवरील रकमा फारशा वाढविता येणार नाहींत. जी शाई धुतली जाणार नाहीं, अशी शाई पोस्ट ऑफिसांतून वापरण्यांत येण्याचा संभव आहे. मनिऑर्डरीची रक्कम पंच करणें, जास्त किमतीच्या मनिऑर्डरीवर विशिष्ट शिक्का मारणें, मनिऑर्डरीच्या पोस्टाच्या पावतीची नक्कल मनिऑर्डरीलाच डकवणें, इत्यादि उपायांचीहि शक्याशक्यता अजमावली जात आहे.

## उत्तर प्रदेशांतील शतायु लोक

उत्तर प्रदेशांत सर्व राज्यांपेक्षा जास्त शतायु लोक आहेत. सबंध भारतांत एकूण ७७,००० लोक शंभर वर्षांपेक्षा जास्त वयाचे आहेत, त्यांपैकी २३,२५८ लोक एकट्या उत्तर प्रदेशांत आहेत. उत्तर प्रदेशाचा पूर्व भाग मागासलेला आणि आर्थिक दृष्ट्या अविकसित आहे, तरी त्यांतच पश्चिम भागापेक्षा अधिक शतायु लोक आहेत.

## हिंदी कपास कापडाचा धंदा

### उत्पादनांत फारशी वाढ नाहीं; निर्गतींत घट

आपल्या देशाच्या ठेक औद्योगिक उत्पादनाच्या २५% टक्के उत्पादन कापड गिरण्यांच्या उत्पादनाचें असतें, ह्यावरून ह्या धंद्याचें महत्त्व लक्षांत येईल. ह्या धंद्यांत सुमारें १३१ कोटी रु. भांडवल गुंतलेलें असून वार्षिक उत्पादनाची किंमत ४०० कोटी रु. आहे. कराच्या रूपानें हा धंदा सरकारला १०० कोटी रुपये देतो. ८,००,००० कामगार ह्या धंद्यांत काम करीत आहेत व त्यांच्या मजुरींची वार्षिक बेरीज १० कोटी रुपये होते. इतर कारखान्यांच्या मानानें कापड गिरण्यांतील कामगारांना अधिक चांगलें वेतन सुटतें.

फॅक्टरी कामगारांचें वार्षिक उत्पन्न ( १९६० )

| | रु. |
|---|---|
| कपास कापड | १७८७ |
| इतर कापड | १४०३ |
| कागद | १२९४ |
| रबर | ११११४ |
| विजेची माशिनरी | १४३६ |
| वीज, गॅस, स्टीम | १४५८ |
| सर्व उद्योगधंदे | १४८० |

गेल्या पांच वर्षांत कपाशीचें उत्पादन स्थिर राहिलें आहे. फार तर ५ ते ६% वाढ झाली आहे. कृत्रिम धाग्यांचें उत्पादन वाढलें आहे. रेयॉनचें उत्पादन ५०% वाढलें. तरी, कृत्रिम धाग्यापासून बनविलेल्या कापडाचा खप भारतांत दर माणशी एक वार एवढाच आहे; दर माणशी कापडाचा एकूण खप १६ वार आहे.

कपाशीची लागवड सुमारें ६० देशांतून ८ कोटी एकर होते. त्या लागवडींपैकी ८१% लागवड आठ देशांत आहे भारत, अमेरिका, चीन, रशिया, ब्राझील, पाकिस्तान, ई आणि मेक्सिको. भारताचें कपाशीच्या पिकाचे बाबतींत जागा स्थान खालील तक्त्यावरून स्पष्ट होईल :—

जगांतील एकूण लागवडींपैकी २३% लागवड भारतांत हे अमेरिका, चीन आणि रशिया ह्यांचें प्रमाण अनुक्रमें १९%, १ आणि ७% आहे. परंतु, उत्पादनाचे बाबतींत भारताचा अनु चौथा लागतो. जागतिक उत्पादनापैकीं भारतांतील उत्पा फक्त ८·५% आहे; अमेरिकेचें ३०·५%, चीनचें १५·५% आ रशियाचें १४·९% आहे. भारतांत दर एकरीं फार कमी कपाशी उत्पादन होतें, त्याचा हा परिणाम आहे.

कापडाच्या निर्गतीचे बाबतींत भारताचा अनुक्रम पहि असून जपानचा दुसरा आहे. ह्या कापडाच्या निर्गतीमु १९६१–६२ मध्यें भारताला ४८ कोटी रुपयांची परदे हुंडणावळ मिळाली; १९५९–६० मध्यें ६४ कोटी रुपयां मिळकत झाली होती. परदेशी बाजारपेठांतील स्पर्धा आत तीव्रतर झाली आहे. पाकिस्तान, स्पेन, फ्रान्स, प. जर्मनी, पू युरोपांतील देश, रशिया, इत्यादींनीं बाजारपेठेंत प्रवेश केल आहे. नव्या नव्या ज्या देशांतून भारताचें कापड खपत असे अशा ठिकाणीं गिरण्यांची उभारणी चालू आहे.

भारतीय गिरण्यांनीं उत्पादनखर्च वाढविल्याखेरीज त्यांन परदेशी बाजारपेठेंतील स्पर्धेला दीर्घकाळ तोंड देतां येणार नाहीं.

| देश | क्षेत्रफळ ·००० एकर | उत्पादन ·००० गांसड्या | दर एकरीं उत्पादन पौंड | खप | निर्गत ·००० गांसड्या | आयात |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (१९६१–६२ | असेरच्या तीन | वर्षांची सरासरी) |
| भारत | १८,७९५ | ४,०२५ | १०२ | ४,६६५ | २३८ | ७८१ |
| अमेरिका | १५,३५३ | १४,४८५ | ४४८ | ८,७६१ | ६,२४३ | १३७ |
| चीन | १३,३५० | ७,४०० | २६४ | ७,८०० | १२५ | २८३ |
| रशिया | ५ ,४९९ | ७,०९७ | ५८४ | ६,२६७ | १,६३३ | ६८३ |
| ब्राझील | ५,०१३ | २,०५० | १९३ | १,२४५ | ६६५ | — |
| पाकिस्तान | ३,३६७ | १,४२५ | २०२ | १,११८ | २९३ | १७ |
| इजिप्त | १,९४५ | १,९५४ | ४८४ | ५४९ | १,५२० | — |
| मेक्सिको | २,०२० | १,९१७ | ४९३ | ४९८ | १,४६३ | — |
| जपान | — | — | — | ३,२२२ | — | ३,२३२ |
| ग्रेट ब्रिटन | — | — | — | १,१९९ | — | १,१७६ |
| प. जर्मनी | — | — | — | १,४५६ | — | १,४७७ |
| फ्रान्स | — | — | — | १ ३६१ | — | १,३७७ |
| इटली | ६६ | ३४ | २४६ | १,०३७ | — | १,०११ |
| इतर | १५,२८३ | ७,१०० | — | ९,००७ | ४,२७७ | ६,५९८ |
| एकूण | ८०,७११ | ४७,४८७ | २८० | ४८,१८५ | १६,४५७ | १६,७७२ |

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

### न्यू विजय इंडस्ट्रीज लि.
**( विश्रामबाग, सांगली )**

वरील कंपनीनें ३० जून, १९६३ अखेर संपलेल्या वर्षी डिस्कौंट वजा जातां ४,८१,९७१ रु. तयार मालाची विक्री केली. मॅनेजिंग एजंटांचें वेतन, घसारा व डेव्हलपमेंट रिबेट, कराची तरतूद, इत्यादि वजा जातां निव्वळ नफा ११,८९७ रु. उरला. भागीदारांना ८% करपात्र डिव्हिडंड देण्यांत येणार आहे. सेंट्रिफ्युगल पंप आणि फौंड्री कास्टिंग्ज ह्यांच्या व्यवहारांतील वाढीमुळें एकूण विक्रींत सुमारें २०% वाढ झाली आहे. कंपनीचे नव्या पद्धतीचे पंप आणि नांगर शेतकऱ्यांत खूप लोकप्रिय झाले आहेत. कोयनेची वीज खेडोंपाडीं पसरली, म्हणजे पंपिंग सेट्सना मागणी वाढणार असून न्यू विजय इंडस्ट्रीजच्या आणखी प्रगतीची त्यामुळें खात्री वाटत आहे. इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट कं. मॅनेजिंग एजंट असून श्री. एस. बी. भिरंगी, ए. एम्. आय्. एस्. ई., एम्. एस्. एम्. ए. हे जनरल मॅनेजर आहेत.

---

### बँक ऑफ महाराष्ट्राचें १९६४ वर्ष

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. कडील ठेवी १९६३ सालीं २४·७६ कोटी रुपयांच्या २९·४५ कोटी रु. वर गेल्या आणि दिलेल्या कर्जांची रक्कम ११·८३ कोटी रु. वरून १४·६७ कोटी रु. वर गेली. इन्व्हेस्टमेंटमधील रक्कम ९·५० कोटी रु. ची १३·४३ कोटी रु. झाली. निव्वळ नफा ९ लक्ष रु. उरला. गेल्या वर्षी तो ८·४४ लक्ष रु. होता. डिव्हिडंडचा दर ९% कायम आहे. परंतु वाढलेल्या भांडवलावर डिव्हिडंड द्यावयाचें असल्यामुळें डिव्हिडंड वाटण्यास ३·८९ लक्ष रु. ऐवजीं ५ लक्ष रु. लागतील.

---

### कापडाच्या बाजारपेठेला चीनचा धोका


युगांडाच्या कापूस मार्केटिंग बोर्डानें चीनच्या सरकारला २० हजार गांसडचा कापसाची विक्री केली असून त्याशिवाय आणखी ८० हजार गांसडचाची विक्री बोर्ड करील असा अंदाज आहे. चीननें युगांडापासून १ लाख गांसडचा कापूस विकत घेतल्यास चीन युगांडाच्या कापसाचें सर्वांत मोठें गिऱ्हाईक ठरेल. १ लाख गांसडचा कापूस म्हणजे युगांडाच्या एकूण कपाशीच्या पिकाचा एकतृतीयांश हिस्सा आहे. कापसाच्या बदला चीन युगांडाला सुती कापड पुरविणार आहे. आतांपर्यंत युगांडाच्या कापसाच्या उत्पादनापैकी ६० टक्के कापूस भारताकडून विकत घेण्यांत येत असे. आफ्रिकेंतील भारताच्या कापडाच्या बाजारपेठेला शह देण्याचा चीनचा हा आणखी एक प्रयत्न आहे, असा तर्क करण्यांत येत आहे. आग्नेय आशिआंतील कांहीं देशांत भारताच्या कापडाशीं स्पर्धा करण्यांत चीननें कांहीं अंशीं यश मिळविलेले आहे.

---

### सिगारेट कंपन्यांविरुद्ध नुकसानभरपाईचे दावे

अमेरिकन सरकारनें नेमलेल्या एका तज्ज्ञांच्या कमिटीनें अतिरिक्त धूम्रपानामुळें कॅन्सरचा उद्भव वाढतो असें मत व्यक्त केल्यामुळें सिगारेट तयार करणाऱ्या अमेरिकन कंपन्यांत चिंतेचें वातावरण पसरलें आहे. धूम्रपान करणाऱ्या ज्या नागरिकांना कॅन्सरची बाधा झालेली आहे त्यांनीं अगर त्यांच्या नातेवाईकांनीं कांहीं अमेरिकन कंपन्यांविरुद्ध नुकसानभरपाईचे दावे दाखलहि केले आहेत. अशा दोन दाव्यांत कोर्टानीं असा निकाल दिला आहे कीं, संबंधित धूम्रपान करणाऱ्यांना त्यामुळेंच फुफ्फुसाचा कॅन्सर झाला परंतु सिगारेट कंपन्यांनीं त्यांना नुकसानभरपाई देण्याचें कारण नाहीं. तज्ज्ञांच्या अहवालामुळें नुकसानभरपाईच्या दाव्यांना यशस्वी विरोध करणें अवघड जाईल अशी भीति सिगारेट कंपन्यांना वाटत आहे.


महाराष्ट्र सरकारनें
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग



तसेंच विजय सेंट्रिफ्युगल पंपस्




१" ते ४" बेल्ट
ड्राईव्ह व
डायरेक्ट
कपल्ड, शिवाय

बोअरिंगचे हँड पंपस्, हँड रहाट इ. इ.

**— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —**
विश्रामबाग — सांगली ( महाराष्ट्र )



**कण आणि क्षण**

लेखकः—श्री. वा. काळे

**तिसरी आवृत्ति प्रसिद्ध झाली !**

पृ. सं. १६०. किं. रु. ३=५०

व्हीनस प्रकाशन,
३८१ क, शनिवार पुणें २.



**श्री महावीर को-ऑप. बँक लि.**
**कोल्हापूर**

हेड ऑफिस : कोल्हापूर ( स्थापना : १९३७ ) फोन नं. १९५ ब्रँच : जयसिंगपूर

अधिकृत व रोख
भरलेलें भांडवल— रु. १ लाख
रिझर्व्ह व इतर फंडस्— रु. १ लाख, ५४ हजार
ठेवी — रु. १९ लाखांवर
खेळतें भांडवल — रु. २३ लाखांवर

★ ठेवींवरील व्याजाचे दर ★

चालू १ टक्का सेव्हिंग ३ टक्के

मुदतबंद ठेव

| मुदत | व्याजाचा दर |
| --- | --- |
| १ वर्षे | ४ टक्के |
| २ „ | ४½ „ |
| ३ „ | ५ „ |
| ५ „ | ५½ „ |
| १ ते ६ महिने | ४½ „ |
| कॉल डिपॉझिट (७ दिवस नोटीसीची) | ४½ „ |

याशिवाय पिग्मी योजना चालू आहे. इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर — ए. डी. पाटील
प्रेसिडेंट — डी. वाय्. मेंच

## ठेवींच्या विम्याच्या योजनेचा विस्तार

व्यापारी बँकांतील ठेवींचा कांहीं मर्यादेपर्यंत विमा उतरण्याची योजना अमलांत आलेली आहे. परंतु ठेवींच्या विम्याच्या ह्या योजनेंत सहकारी बँकांचा समावेश नाहीं. सहकारी पतपेढ्यांतील ठेवींना ह्या संरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी रिझर्व्ह बँकेच्या कायद्यांत बदल करण्याचें घाटत आहे. रिझर्व्ह बँकेनें ह्यासंबंधीं दुरुस्ती सुचविणारा एक मसुदा राज्य-सरकारें आणि सहकारी बँका ह्यांच्याकडे त्यांचे विचार अजमावण्यासाठी धाडला आहे. राज्य-सरकारें आणि सहकारी बँका ह्यांचे मसुद्यावरील विचार कळून आल्यावर त्या दृष्टीनें रिझर्व्ह बँकेच्या कायद्यांत बदल करण्यांत येणार आहे. शेतीसाठी मध्यम व अल्प मुदतींचीं कर्जे देण्याच्या पद्धतींत काय सुधारणा करावी ह्याची चर्चा करण्यासाठीं नियोजन-समितीची बैठक भरविण्यांत आली होती. त्यावेळीं रिझर्व्ह बँकेच्या शेतीच्या पत खात्यातर्फे हा विषय मांडण्यांत आला होता. व्यापारी बँकांतील ठेवींना विम्याचें संरक्षण मिळाल्यामुळें त्यांना सहकारी बँकांच्या तुलनेनें कांहींसा फायदा मिळतो. हा फायदा सहकारी बँकांनाहि मिळवून देण्याची आवश्यकता आहे असे विचार बैठकींत व्यक्त करण्यांत आले. रिझर्व्ह बँकेकडून आलेल्या दुरुस्तीच्या मसुद्यांत कांहीं फेरफार करून कांहीं राज्य-सरकारांनीं तो मान्य केल्याच्या वार्ता आहेत. तथापि मद्रास आणि बंगाल ह्या राज्यांनीं मसुद्याला विरोध दर्शविला आहे. दुरुस्तीच्या संकलित मसुद्यांत रिझर्व्ह बँकेला सहकारी संस्थांचा कारभार जरूर पडल्यास गुंडाळण्याचा अगर त्यांचें एकत्रीकरण करण्याचे अधिकार देण्यांत आलेले आहेत. ह्या अधिकारांना त्यांचा विशेष विरोध आहे. सहकारी बँकांना सर्व निम–सरकारी, स्थानिक आणि ट्रस्ट धारण करणाऱ्या संस्थांकडून ठेवी घेण्याचे अधिकार राज्यसरकारांनीं द्यावे असा आदेशहि मिळण्याचा संभव आहे. सहकारी संस्थांच्या भरभराटीला अनेक प्रकारें उत्तेजन देण्याच्या धोरणाचाच हाहि एक भाग आहे. व्यापारी आणि सहकारी संस्थांच्या स्पर्धेतून काय निष्पन्न होईल, हा प्रश्न मात्र निराळा.

## राजस्थानचा दारूबंदीला विरोध

दारूबंदीच्या कार्यक्रमाबद्दल चौकशी करण्यासाठीं नेमलेल्या टेकचंद कमिटीचा अहवाल कांहींहि आला तरी राजस्थानांत तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या नंतरहि दारूबंदी सुरू होण्याची शक्यता नाहीं. राजस्थान सरकारनें ग्रामीण भागांत वीजपुरवठा करण्याचें व राजस्थान कालवा खोदण्याचें काम चालू केलेलें आहे. अशा परिस्थितींत दारूबंदीमुळें होणाऱ्या उत्पन्नास मुकणे राज्यसरकारला परवडणार नाहीं. शिवाय बेकायदा गाळल्या जाणाऱ्या दारूभट्ट्यांचा बंदोबस्त करणेंहि अतिशय अवघड आहे.

## लष्करी महत्वाचा नवा रस्ता

लडाखमधील लेह आणि हिमाचल प्रदेशांतील मनाली हीं दोन ठिकाणे जोडणारा फार उंचीवरून जाणारा रस्ता बांधण्याचें उत्तर प्रदेश सरकारनें ठरविलें आहे. रस्त्याची लांबी ६० मैल होईल आणि तो बांधण्यास २ ते ३ वर्षांचा काळ लागेल. उत्तर सरहद्दीवरील लष्करी वाहतूक ह्या नव्या रस्त्यामुळें भर हिंवाळ्यांत सुद्धां चालू ठेवता येईल. रस्ता बांधण्यासाठी बर्फांतहि वापरता येण्यासारखी खास यंत्रसामग्री पुरविण्याचें अमेरिकेनें मान्य केले आहे.

★ सहकाराच्या क्षेत्रांत केलेल्या कामगिरीचा महाराष्ट्राला अभिमान वाटतो ★

**महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.**

*सुद्धां आपल्या ५१ वर्षांवरील सेवेचा अभिमान बाळगते.*

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | ... | ४ कोटी ५६ लाख |
| गंगाजळी व फंड | ... | १ कोटी २६ लाख |
| ठेवी | ... | ३० कोटी १३ लाख |
| खेळतें भांडवल | ... | ६५ कोटी ६१ लाख |

महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेंत वाढत्या प्रमाणांत ठेवी ठेवून राज्यांतील शेतकऱ्यांना साहाय्य करण्यास आम्हांला मदत करा.

निरनिराळ्या आकर्षक योजनांसाठी तुमच्या नजिकच्या महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या कोणत्याहि शाखेकडे चौकशी करा.

: मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट मुंबई.
: प्रादेशिक कचेरी : महाल : नागपूर.
टेलिफोन नं. २५५४७४–७५, २५६२१४

बृहन्मुंबईतील शाखा : (१) भायखळा (२) गोरेगांव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्ले (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम

**दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा**

शेड्यूल्ड बँक

हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.

टेलिफोन नं. ६४ ] स्थापना १९३६ [ तारेचा पत्ताः–युवर बँक

—: वाढविलेले नवीन व्याजाचे दर :—

चालू :–०·५० टक्के. सेव्हिंग्ज् बँक :–३ टक्के

मुदत ठेवी

१ वर्ष–४½ टक्के, २ वर्षे–४¾ टक्के, ३ वर्षे–४¾ टक्के, ४ वर्षे–५ टक्के, ५ वर्षे–५½ टक्के.

एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात. तसेंच, कंपलसरी सेव्हिंग्ज व क्युम्युलेटिव्ह ठेवींचे योजनेचा गिऱ्हाइकांनीं अवश्य फायदा घ्यावा.

शाखा–विस्तार

शाखा–१. मुंबई–फोर्ट, २. मुंबई–गिरगांव, ३ मुंबई–दादर, ४. मुंबई–डोंबिवली, ५. नाशिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. कोल्हापूर–मार्केट यार्ड, ११. हलकर्णी, १२. इचलकरंजी, १३. फलटण, १४. अकलूज, १५. कराड, १६. कोरेगांव, १७. मसूर, १८. उंबज, १९. ओगलेवाडी, २०. करमाळा, २१. सातारा रोड. दि. ३१–१२–१९६२

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ९,६०,८२५ |
| गंगाजळी | रु. | ६,५०,००० |
| ठेवी | रु. | ३,४३,००,०००हून अधिक |
| खेळतें भांडवल | रु. | ४,००,००,०००हून अधिक |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम., *जनरल मॅनेजर.*

रा. ना. गोडबोले, बी. ए., बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी. *चेअरमन.*

### निर्यातवाढीच्या प्रयत्नांसाठी परदेशीय दौरे

परदेशीय चलनाची शक्य तितकी बचत करण्याच्या दृष्टीनें परदेशी जाणाऱ्या हिंदी प्रवाशांना अगदीं बेतानें परदेशी चलन देण्याचें धोरण स्वीकारण्यांत आलेलें आहे. परंतु आतां रिझर्व्ह बँक ह्या धोरणांत थोडासा बदल करणार असल्याची वार्ता आहे. निर्यात वाढविण्यासाठी मोठमोठ्या हिंदी कंपन्यांच्या प्रतिनिधींना परदेशांत जावें लागलें. अशा प्रवासासाठी कंपन्यांना दरवेळीं रिझर्व्ह बँकेकडे अर्ज करून परदेशीय चलनाची सोय करावी लागते. ह्या पद्धतींत बदल करून एकदमच मोठी रक्कम कंपन्यांना देण्यांत येणार आहे. मात्र ज्या कंपन्यांची गेल्या दोन अगर तीन वर्षांतील सरासरी निर्यात २० लाख रुपयांपेक्षा कमी नसेल त्यांनाच ही सवलत मिळणार आहे. प्रत्येक कंपनीला आगामी १२ महिन्यांच्या कालांत परदेशीं प्रवास करण्यासाठी किती परदेशीय चलन लागेल त्याचा अंदाज बँकेकडे द्यावा लागेल. ह्या अंदाजाचा विचार करून बँकेच्या दृष्टीनें वाजवी असणाऱ्या परदेशिय चलनाच्या रकमेच्या निम्मी रक्कम संबंधित कंपनीला ताबडतोब उपलब्ध करून देण्यांत येईल. ही रक्कम सामान्यपणें कंपनीच्या प्रतिनिधीला ६ महिने पुरेल इतकी असेल. पहिल्या प्रथम ५० टक्के रक्कम घेतल्यावर बाकीची रक्कम पहिले सहा महिने पुरे होण्याच्या अगोदर देण्यांत येईल. परदेशांतील प्रवास पुरा झाल्यावर कोणत्या परिस्थितींत हा प्रवास करणें जरूरीचें झालें आणि त्यामुळें प्रत्यक्ष काय पदरांत पडलें ह्यासंबंधीं कंपनीला बँकेकडे अहवाल सादर करावा लागेल. निर्यात व्यापार करणाऱ्या कंपन्यांच्या प्रतिनिधींना वारंवार परदेशांत जावें लागतें. निर्यात वाढविण्याच्या दृष्टीनें प्रयत्न करतांना परदेशीय प्रवासासाठी लागणाऱ्या चलनाची अडचण मोठ्या कंपन्यांना पडते. त्यांची ही अडचण दूर करण्यासाठी रिझर्व्ह बँकेनें ही नवीन पद्धत अमलांत आणण्याचें ठरविलें आहे.

### लांचलुचपतीला उघड विरोध करण्याची तयारी नाहीं

लांचलुचपतीस आळा घालण्यासाठी ग्रेटब्रिटनमध्यें १९०६ सालीं स्थापन केलेल्या "लीग फॉर दि प्रिव्हेन्शन ऑफ करप्शन" नें आपलें काम आतां बंद केलें आहे. जनतेची अनास्था हें त्याचें कारण होय. संस्था बंद करण्याचा ठराव मांडण्यांत आला, त्या सभेला फक्त १२ सभासद उपस्थित होते. पूर्वीं संस्थेच्या पटावर हजारों वजनदार नागरिक होते; आतां फक्त ५१ उरले. "५० वर्षांपूर्वीपेक्षा आतां लांचलुचपत मुळींच कमी झालेली नसतांना त्याला उघड विरोध करण्यास जनतेची तयारी उरलेली नाहीं" असें लीगचे अध्यक्ष सर फेलिक्स ब्रुनर हे म्हणाले.

### 'ब्लॅक बर्ड इंटरनॅशनल स्टूडंट्स एंपोरियम'

वरील नांवाच्या एका बनावट संस्थेचा जनरल सेक्रेटरी म्हणून एक मनुष्य बक्षिसांच्या स्पर्धेसाठी प्रवेश-फीसकट कविता आणि लेख मागवतो आणि लोकांना फसवतो; त्याच्यापासून सावध राहावें, असा ओरिसा राज्याच्या पोलिस खात्यानें इशारा दिला आहे. कवितेला प्रवेश-फी ४ आणे, तर लेखांना १० ते १५ रु. आहे. बक्षिसाच्या आशेनें कित्येक कवि व लेखक भुलतात, त्यांना हा सावधगिरीचा इशारा आहे.

### केनेडी लायब्ररीसाठीं फंड उभारणी

बॉस्टन येथें प्रेसिडेंट जॉन एफ. केनेडी लायब्ररी बांधण्यासाठी वर्गणी गोळा करण्यांत येत आहे. हारवर्ड विद्यापीठानें जागा देऊं केली आहे. जागतिक बँकेचे माजी अध्यक्ष मि. युजिन ब्लॅक हे लायब्ररी ट्रस्टींचे चेअरमन राहातील. ह्या योजनेला सुमारें ४ कोटी रु. खर्च येईल.


५० वर्षांवर चालत आलेली कोल्हापुरांतील पहिली आद्य सहकारी संस्था

**दि कोल्हापूर अर्बन**

**को-ऑपरेटिव्ह बँक लि. कोल्हापूर**

[ स्थापना १९१३ इ. ]

रजि. नं. १८३२२ फोन नं. ५०२

| | |
|---|---|
| अधिकृत व खपलेलें शेअर भांडवल | रु. २,००,००० |
| रिझर्व्ह फंड | रु. १,४५,२२२ |
| इतर फंडस् | रु. ७६,९५५ |

सभासद संख्या ४,५२९

सुरक्षित व आकर्षक दरानें ठेवी स्वीकारल्या जातात. रिकरिंग डिपॉझिट्स् खातें व दैनिक भिशीचे व्यवहार सुरू आहेत. सोनें-चांदीचे जिन्नस, व्यापारी माल व मुदतबंद ठेवी तारणावर 'ब' वर्ग सभासदांनाहि कर्जे देण्याची सोय आहे. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

ए. ए. बोगार, मॅनेजर. ज्ञानदेव जोती सासने, प्रेसिडेंट.

दि कोल्हापूर अर्बन को-ऑप. बँक, लि. कोल्हापूर



फोन नं. ५ तार : 'गंगासाकर'

**श्री पंचगंगा**

**सहकारी साखर-कारखाना लि.,**

गंगानगर – इचलकरंजी ( जि. कोल्हापूर )

गंगामाईच्या सोन्यांतील हजारों शेतकऱ्यांना 'सोनियाच्या पाउलांची' प्रचीति आणून देणारा, माळरानावर नंदनवन फुलविणारा आणि कार्यक्षेत्रांतील हजारों कुटुंबांवर मायेची पाखर घालणारा कोल्हापूर जिल्ह्यांतील अग्रेसर साखरकारखाना.

कारखान्यानें १९६२–६३ च्या हंगामांत उत्पादनाचे बाबतींत दक्षिण महाराष्ट्रांतील सहकारी साखरकारखान्यांमध्यें उच्चांक प्रस्थापित करून सर्वांची प्रशंसा मिळविली आहे;

आणि आतां १९६३–६४ चे गळित हंगामांत दोन लाख टन उसाचें गाळप करून अडीच लाख साखरपोत्यांचें उत्पादन-उद्दिष्ट गांठण्याचे महत्त्वाकांक्षेनें ता. ४–१०–६३ रोजीं गळितास सुरुवात केली असून २६ जानेवारी १९६४ पर्यंत सव्वा लाखांचेवर साखरपोत्यांचें उत्पादन झालेलें आहे.

**भारतीय प्रजासत्ताक चिरायु होवो !**

वी. एन्. गरगटे, मॅनेजिंग डायरेक्टर. एम्. व्ही. सुलतानपुरे, व्हाइस चेअरमन. रत्नाप्पा कुंभार, चेअरमन.

### मिलच्या आणि हातमागाच्या कापडाची निर्यात
### (१९५० ते १९६१)

| वर्ष | कापड (दशलक्षवार) | | | किंमत (कोटी रु.) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मिल | हातमाग | एकूण | मिल | हातमाग | एकूण |
| १९५० | १०७८·५ | ४१·१ | ११९·६ | ९०·२३ | ६·५७ | ९६·९० |
| १९५१ | ७३४·४ | ४३·७ | ७७८·१ | ७२·६२ | १०·४० | ८३·०२ |
| १९५२ | ५४८·३ | ५४·१ | ६०२·६ | ५५·५८ | ९·३१ | ६४·८९ |
| १९५३ | ५९४·२ | ६३·२ | ६५७·४ | ४६·४० | १०·०२ | ५६·४२ |
| १९५४ | ८०९·८ | ५७·३ | ८६७·१ | ८·५६ | ८·३८ | ६६·९३ |
| १९५५ | ६९२·४ | ६०·४ | ७५२·८ | ४९·३३ | ८·४४ | ५७·७८ |
| १९५६ | ६८४·० | ५९·९ | ७४४·८ | ४८·३१ | ८·६७ | ५६·९८ |
| १९५७ | ८३९·७ | ३८·३ | ८७८·० | ५८·९५ | ५·५६ | ६४·५१ |
| १९५८ | ५८१·६ | ३५·२ | ६१६·७ | ४०·२५ | ५·२४ | ४५·४९ |
| १९५९ | ८१४·६ | ३५·६ | ८५०·२ | ५४·७२ | ६·५९ | ६१·३१ |
| १९६० | ६९४·८ | २८·९ | ७२३·७ | ५४·७० | ५·०२ | ५९·७२ |
| १९६१ | ५७३·४ | २८·९ | ६०२·३ | ४६·०५ | ४·८६ | ५०·९१ |

### नेवेली येथील विद्युत्-केंद्राचा विस्तार

नेवेली येथें रशिआच्या साह्यानें बांधण्यांत येत असलेल्या उष्णता जनित विद्युत् निर्मिती-केंद्राचा पहिला टप्पा बहुधा येत्या मार्च अखेर पुरा करण्यांत येईल. विद्युत्-निर्मितिचे चार यंत्रसमूह आतां-पर्यंत चालू करण्यांत आलेले आहेत; पांचवा व शेवटचा समूह दोन महिन्यांत चालू करण्यांत येईल. नेवेली येथील विद्युत् केंद्राचा विस्तार करून त्यापासून अधिक वीज निर्माण करण्या-संबंधीं सध्यां रशिआशीं वाटाघाटी करण्यांत येत आहेत. त्या पूर्ण होऊन फलद्रूप झाल्यास ह्या विद्युत् केंद्रांतून ४ लाख किलोवॅट वीज निर्माण होऊ लागेल. भारत आणि रशिआ ह्यांच्या दरम्यानच्या व्यापारांत त्याचप्रमाणें तांत्रिक आणि आर्थिक सहकार्यास अद्याप पुष्कळच वाव आहे, असें मत मद्रासमधील रशिआचे कॉन्सल जनरल ह्यांनीं व्यक्त केला आहे.

### भारतीय शाकाहारी कॉंग्रेस

भारतामधील पहिल्या शाकाहारी कॉंग्रेसचें राष्ट्रीय अधिवेशन मुंबई येथें भरलें होतें. अधिवेशनाच्या अध्यक्ष श्रीमती रुक्मिणीदेवी अरुंडेल ह्यांनीं परदेशांत जाणाऱ्या हिंदी लोकांना असें आवाहन केलें कीं, त्यांनीं परदेशांतील चुकीच्या गोष्टींचें अनुकरण करूं नये. त्या म्हणाल्या कीं, कांहीं हिंदी लोक परदेशांत गेल्यावर मांसाहार करूं लागतात. वास्तविक परदेशगमनापूर्वी ते शाका-हारीच असतात. खुद्द युरोपांत मात्र हळुहळु शाकाहाराचा प्रसार वाढत चाललेला आहे. परदेशांतून कॉंग्रेसला आलेल्या प्रतिनिधीं-तर्फे बोलतांना एक प्रतिनीधि म्हणाला कीं, सध्यां जगाचा आर्थिक दृष्ट्या व शास्त्रांच्या प्रगतीच्या दृष्टीनें विकास झालेला आहे. परंतु जिवंत प्राण्यांच्या सृष्टीकडे बघण्याची जगाची दृष्टि बदललेली नाहीं. माणसानें प्राण्यांशीं असलेल्या संबंधाचा मूलगामी विचार करण्यास शिकलें पाहिजे; तरच माणसामाणसांतील संबंध सुधार-ण्याची आशा आहे.


॥ श्री ॥

दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें २.

अधर्माची अवधी तोडीं । दोषांची लिहिली फाडीं ।
सज्जनाकरवीं गुढी । सुखाची उभवी ॥ —श्रीज्ञानेश्वरी

भारतीय प्रजासत्ताक चिरायु होवो !

—प्रजासत्ताक दिनानिमित्त —

आमचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतक यांना अभिवादन व हार्दिक शुभेच्छा !

शं. ल. लिमये, बी. एस्सी., एल्एल्. बी.
अध्यक्ष

वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४५] मुगभाट, मुंबई-४. [टेलिफोन ७२१००

बचतीच्या आकर्षक योजना

(१) स्पेशल सेव्हिंग — व्याजाचा दर ३॥ टक्के
(२) त्रैवार्षिक मासिक बचत — " ३। "
(३) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें — " ५ "

मुदतीच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.

मॅनेजर—ना. शं. कानिटकर


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.